## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. १२/६/२०१८

**विषय क्रमांक :– ३०४ त्वर्य**

कोथरुड बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पडिक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे (सन २०१८–१९) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेमंत व्ही.शहा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र. रू. ४,२८,२९,४१८=४५ पेक्षा १९.९८% जास्त) दराने रक्कम रुपये ५,१३,८६,७३६=२५ (अक्षरी :– पाच कोटी तेरा लाख शहयाऐंशी हजार सातशे छत्तीस रुपये पंचवीस पैसे) दराने सादर केली आहे. सदर काम मे.हेमंत व्ही.शहा हे तडजोडीने (१२.००% जास्त) दराने करण्यास तयार झालेले आहे. मा.तांत्रिक समितीने (र.रुपये३,५८,३८,९२५=२०) चे पु.ग.प. मान्य केलेले असून त्यानुसार सुधारीत १२.००% जास्त दराने म्हणजेच (र.रु.४,०१,३९,५९६=२२) (अक्षरी :– चार कोटी एक लाख एकोणचाळीस हजार पाचशे शहाण्णव रुपये बावीस पैसे) पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामास प्राईस बीडच्या दिनांकापासून काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस, बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआ–२/१४३ दि.६/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३०५ त्वर्य**

देवाची उरुळी/फुरसुंगी कचरा डेपो येथील कॅपिंग/लँडफिलचे कामकाजासाठी भाडेतत्वावर चेन बुलडोझर मशीन पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.नॅशनल अर्थमुव्हर्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९९,९९,०२५/– पेक्षा १.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९८,३९,०४०=६० रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१४५ दि.८/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३०६ त्वर्य**

कोथरुड बावधन क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या रिईन्स्टेटमेंट व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जय शिवशंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,९९,९९,०९६/– पेक्षा ३३.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३२,१९,४०२=४६ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१४८ दि. ८/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३०७ त्वर्य**

वारजे कर्वेनगर कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१३,३१,३२ व उत्तमनगर, शिवणे मध्ये विविध ठिक़ाणी पडिक हद्दीची ठेकेदारी पध्दतीने स्वच्छता करुन घेणे (सन २०१८–१९) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सागर सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५,२३,०५,४५८=४० पेक्षा ४.०५% जास्त) र.रुपये ५,४४,२३,८२९=४६ पर्यंत झाले असले तरी सदर काम पुर्वगणनपत्रक र.रु.५,२३,०५,४५८=४० पर्यंत व निविदा उघडलेचे दिनांक १५/५/२०१८ पासून त्यांचे टेंडर दराने काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआ(परि–३)/१४९ दि.८/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३०८ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये Microwave Based Medical Wast Disinfection Machine / System खरेदी करणे.( टेंडर क्रमांक ७३ सन २०१७–१८ ) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण तीन निविदा आल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक एजी सेल्स यांचेकडून पुणे महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये Microwave Based Medical Waste Disinfection Machine / System Capacity 30 Ltr. क्षमतेचे जीएसटी करासहित एक नग रक्कम रूपये २९,९७,२००–/ आणि Microwave Based Medical Waste Disinfection Machine / System Capacity 60 Ltr. क्षमतेचे जीएसटी करासहित एक नग रक्कम रूपये ४०,००,२००/– असे एकुण २ नगांची रक्कम रूपये ६९,९७,४००/– ( अक्षरी रक्कम रूपये एकोणसत्तर लाख सत्यानव हजार चारशे फक्त ) पर्यंत खरेदी करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१५० दि.११/६/२०१८ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१८-२०१९
RE 31 F / R-5 167
महापौर विकास निधी
मान्य तरतूद रक्कम रूपये १०,००,००,०००/- पैकी ६९,९७,४००/-

**विषय क्रमांक :- ३०९ त्वर्य**

औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. ८ व ९ पडीक हद्दीकरीता आऊट सोर्सिंग कचरा संदर्भात झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.Shree Enterprises यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.३,६८,०७,५४४=८० पेक्षा ८.७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,००,०९,८०१=१९७ पैकी उपलब्ध तरतुद र.रु.३,६८,०७,५४४=८० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्त्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने व आऊटसोर्सिंग कचरा संदर्भात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे दि.१/४/२०१८ पासुन वेतन थकल्याने दि. १/४/२०१८ रोजी पासून काम करवून घेणेस, तसेच त्याचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उआ(परि-२/१५१ दि.११/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ३१० त्वर्य**

प्रभाग क्र. २९ ब मध्ये मनपा शाळा क्र. ८० पाडून नव्याने ई-लर्निंग स्कुल उभारणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.प्रमोद एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४५,९५,४४०/- पेक्षा २५.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३४,३५,०९१=४० रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/१५७ दि. १२/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ३११ त्वर्य**

महापालिका सहाय्यक आयुक्त हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालय यांचे कार्यक्षेत्रातील विविध मनपा शाळांची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणे ( भाग-२ ) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सागर वॉटर मॅनेजमेंट ॲन्ड सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६१,३५,००१/- पेक्षा ३४.३६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,२७,०१४=६५ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रकमेपर्यत काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/१५९ दि. १२/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ३१२ त्वर्य**

पुणे महानगरपालिका विस्तारीत इमारतीमधील डोम सुशोभिकरण व इतर कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दि रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,९३,३५,८७३/- पेक्षा १०.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,७३,७९,०८२=६५ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/१६० दि. १२/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ३१३ त्वर्य**

मनपा मुख्य भवन येथील नवीन प्रशासकीय इमारतीसाठी फायर अलार्म सिस्टीम पुरविणे, बसविणे व चालु करुन देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एच.डी.फायरकॉन टेक्नो प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६३,४८,९३२/- पेक्षा २५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४७,६१,६९९/- पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी त्यापोटी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/विद्युत/१६१ दि. १२/६/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३१४ त्वर्य**

मा.दिलिप वेडेपाटील व मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १५ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, (यादी क्र. एसए २), पान क्र.१६५, अ.क्र.२६२, प्रभाग क्र. १५ क मधील बुधवार पेठ व प्रभागात इतरत्र रस्ते करणे | २० लाख | --- |
| २. | १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १२, शहरातील रस्ते कॉंक्रीटने विकसित करणे, (यादी क्र. एसए १५), पान क्र.१९७, अ.क्र.३०६, प्रभाग क्र.१५ क मधील शनिवार पेठ व प्रभागात इतरत्र यु.टी.डब्लू.टी. करणे | १० लाख | --- |
| ३. | पान क्र.१९७, अ.क्र.३०७, प्रभाग क्र.१५ क मधील अहिल्यादेवी हायस्कुल ते वीर मारूती परिसरात यु.टी.डब्लु.टी. करणे | १० लाख | --- |
| ४. | पान क्र.१९७, अ.क्र.३०८, प्रभाग क्र. १५ क मधील मोतीबाग ते बापटवाडी परिसरात व प्रभागात इतरत्र यु.टी.डब्लु.टी.करणे. | १० लाख | --- |
| | नविन सुचविलेली कामे | | |
| १. | प्रभाग क्र.१५ क मध्ये संभाजी पोलिस चौकी नुतनीकरण करणे. | --- | २४ लाख |
| २. | प्रभाग क्र.१५ क कै.वा.ब.गोगटे शाळेमध्ये विविध विकास कामे करणे. | --- | १८ लाख |
| ३. | प्रभाग क्र. १५ क मधील विविध पोलिस चौक्यांमध्ये दुरूस्तीविषयक व विविध विकास कामे करणे. | --- | ८ लाख |

**विषय क्रमांक :– ३१५ त्वर्य**

मा.दिलिप वेडेपाटील व मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १५ क मध्ये शिवाजी रस्ता येथील ब्लॉक काढून डांबरीकरण करणे व फुटपाथ करणेसाठी र.रुपये १ कोटी ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. १, शहरातील रस्ते डांबरीकरण करणे, (यादी क्र. एसए २), १)पान क्र. १६५, अ.क्र. २५३, प्रभाग क्र. १५ क मधील शिवाजी रस्ता मिलिंग करुन डांबरीकरण करणे | ५० लाख | --- |
| २)पान क्र. १६५, अ.क्र. २५४, प्रभाग क्र. १५ क मधील फडगेट पोलिस चौकी सिग्नल ते चिंचेची तालीम रस्ता मिलिंग करुन डांबरीकरण करणे | ५० लाख | --- |
| ३)पान क्र. १६५, अ.क्र. २६४, प्रभाग क्र. १५ क मधील रस्ते तयार करणे | ५० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. १५ क मध्ये शिवाजी रस्ता येथील ब्लॉक काढून डांबरीकरण करणे व फुटपाथ करणे | --- | १ कोटी ५० लाख |

**विषय क्रमांक :– ३१६ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

सन २०१० मध्ये पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी ''फ्लायओव्हर'' हा लघुचित्रपट (शॉर्ट फिल्म) तयार केला होता. '' रेल्वे रुळ ओलांडतांना नागरिकांनी रेल्वे पुलाचा वापर करावा आणि अपघात टाळावेत.'' या सामाजिक विषयावर समाजप्रबोधनपर २२ मिनिटांचा लघुपट तयार केला होता. विद्यार्थ्यांमध्ये, नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सदर लघुपट बऱ्यांच शाळांमध्ये, कार्यालयामध्ये वस्त्यांमध्ये दाखविण्यात आला होता. सदर लघुपटाचे पुणे शॉर्ट फिल्म फेस्टिवल, गुजरात आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल, जयपूर आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल, नाशिक आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवल व नॅशनल अकॅडमी ऑफ सिनेमा ॲड टेलीव्हिजन, बेंगळूरु या

फेस्टिव्हलमध्ये नामांकन मिळाले होते. पुणे आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिवलमध्येही हा लघुपट दाखविण्यात आला होता. सन २०१३ मध्ये या लघुपटाची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस मध्ये नोंद झाली होती.हि पुणे महानगरपालिकेस मोठ्या अभिमानाची बाब आहे.

वरील बाबींचा विचार करता पी.एम.सी. एम्लॉईज युनियन व पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यामार्फत या आर्थिक वर्षात ३० मिनिटांचा एक लघुपट तयार करण्यात येणार आहे. या लघुपटांमध्ये सचिन नावाच्या एका गरीब मुलाची गोष्ट दाखविण्यात येणार आहे. ज्याचे क्रिकेटमध्ये सचिन तेंडूलकर सारखा क्रिकेटर व्हायचे स्वप्न आहे, त्याचे हे स्वप्न कसे पूर्ण होते की नाही हे या लघुपटातून मांडण्यात येणार आहे. या लघुपटांमध्ये काम करणारे सर्व कलाकार हे पुणे महानगरपालिकेचे सेवक असणार आहेत व बालकलाकारही पुणे महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी असतील. सर्व खालील सेवक या लघुपटाचे काम आपले कार्यालयीन दैनंदीन काम सांभाळून कार्यालयीन वेळेनंतर आणि सुट्टिच्या दिवशी करणार आहेत. तरी सदर लघुपट तयार करणेबाबत खालील बाबींस मान्यता द्यावी.

१) सदर लघुपटांसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त चित्रपटांच्या कामास सहभाग घेणेस व लघुपट तयार करणेस.

२) पुणे महानगरालिकेच्या मालकीच्या ज्या ज्या इमारतींमध्ये लघुपटाचे चित्रिकरण होणार अहे त्या जागा चित्रीकरणांसाठी विनामुल्य उपलब्ण करुन देणेस.

३) सदर लघुपटांसाठी जो खर्च होणार आहे त्याची ५०% रक्कम रुपये २,९९,०००/- (अक्षरी - दोन लाख नव्व्याणव हजार रु.फक्त) पुणे महानगरपालिकेतर्फे विशेष बाब म्हणून देणगी स्वरुपात देणेस.

या फिल्मसाठी काम करणारे सेवक खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | सेवकाचे नाव | हुद्दा | खाते |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजय मोरे | माहिती व जनसंपर्क अधिकारी | माहिती व जनसंपर्क कार्यालय |
| २. | श्री.गणेश देविदास कदम | लिपिक टंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| ३. | श्री.गणेश चंद्रकांत दुगाने | लिपिक टंकलेखक | सांस्कृतिक विभाग |
| ४. | श्री.सुरेश तुकाराम परदेशी | उच्चश्रेणी लघुलेखक | अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) |
| ५. | श्री.आशिष लक्ष्मण चव्हाण | वरिष्ठ लिपिक | सांस्कृतिक विभाग |
| ६. | श्री.प्रशांत सुरेश चव्हाण | लिपिक टंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग |
| ७. | श्री.श्रीधर रामचंद्र चव्हाण | लिपिक टंकलेखक | माहिती व तंत्रज्ञान विभाग |
| ८. | श्री.प्रदिप नामदेव महाडिक | वरिष्ठ लिपिक | क्रीडा विभाग |
| ९. | श्री.शिवाजी विठ्ठल केदारी | उप अधिक्षक | कामगार कल्याण विभाग |
| १०. | श्री.अशोक धर्मा लांडगे | उप अधिक्षक | मुख्य व लेखा विभाग |
| ११. | श्री.राजेश शंकरराव कांबळे | वरिष्ठ लिपिक | मुख्य अभियंता प्रकल्प |
| १२. | श्री.दिपक नामदेव भोसले | लिपिक टंकलेखक | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय |
| १३. | श्री.सचिन चंद्रकांत दळवी | वरिष्ठ लिपिक | परवाना व आकाशचिन्ह विभाग |
| १४. | श्री.विशाल देविदास कदम | लिपिक टंकलेखक | कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय |
| १५. | श्री.गिरीश दत्तात्रय दारवटकर | शिपाई | क्रीडा विभाग |
| १६. | श्री.राजेश शांताराम वाजे | फायरमन | सिंहगड फायर स्टेशन |
| १७. | श्री.महादेव जिवराज जाधव | कचरा मोटार बिगारी | आरोग्य कार्यालय |
| १८. | श्री.सनी प्रदीप भंडारे | बिगारी | क्रीडा विभाग |
| १९. | श्री.गणेश शिवहरी परिहार | शिपाई | क्रीडा विभाग |
| २०. | श्री.तकाराम किसान चव्हाण | सेवानिवृत्त सेवक | |

**विषय क्रमांक :- ३१७ त्वर्य**

मा.दिलिप बराटे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

आर्किटेक्ट श्री.ख्रिस्तोफर चार्ल्स बेनेंचर यांची संस्था,CCBA डिझाईन्स प्रा.लि.पुणे,पुण्यात १९९७ पासून कार्यरत आहे.

तसेच आर्किटेक्ट श्री खुशरू इराणी,सन १९९७ पासून पुण्यात आर्किटेक्ट म्हणून काम करित असून त्यांची संस्था 'खुशरू इराणी डिझाईन स्टुडिओ ' या नावाने पुण्यात कार्यरत आहे.

वरील दोन्ही संस्थेस पुणे महानगरपालिकेचे भवनरचना विभागाचे 'आर्किटेक्ट पॅनेलवर' समाविष्ट करून घेणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- ३१८ त्वर्य**

मा.अनिल टिंगरे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १ ड (कळस-धानोरी) मधील सर्व्हे नं. ६७ धानोरी मध्ये असलेल्या ९० आर ओपन क्षेत्रामध्ये क्रीडा संकूल विकसीत करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ३०, शहरामध्ये भूमिगत केबल टाकणे, (यादी क्र. एसबी ७), पान क्र. २२७, अ.क्र. १६, प्रभाग क्र.१ ड (कळस-धानोरी) मधील विश्रांतवाडी परिसरामध्ये विद्युत केबल भुमिगत करून विद्युत विषयक विविध कामे करणे | २० लाख | --- |
| २. | १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११२, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एसयु १), पान क्र.२७३, अ.क्र.९, प्रभाग क्र.१ ड (कळस-धानारी) मधील धानोरी येथे असलेल्या वन विभागाच्या जागेवर वन उद्यान विकसित करणे. | ३० लाख | --- |
| | नविन सुचविलेले काम | | |
| १. | प्रभाग क्र. १ ड (कळस-धानोरी) मधील सर्व्हे नं. ६७ धानोरी मध्ये असलेल्या ९० आर ओपन क्षेत्रामध्ये क्रीडा संकूल विकसीत करणे | --- | ५० लाख |

**विषय क्रमांक :- ३१९ त्वर्य**

मा.अनिल टिंगरे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १ ड (कळस-धानोरी) मधील सर्व्हे नं. ११५ विश्रांतवाडी येथील दफनभूमी विकसीत करणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, २. प्राथमिक शिक्षण, पान क्र. ९८, अ.क्र. ११, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, वर्गखोल्या बांधणे, मैदाने विकसित करणे व मूलभूत सोयीसुविधांसाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र.एसजे २), पान क्र.२३८, अ.क्र.६, प्रभाग क्र.१ ड (कळस-धानोरी) पालिकेच्या वसंतराव टिंगरे विद्यालयातील हॉलचे उर्वरित काम करणे | २० लाख | --- |
| | नविन सुचविलेले काम | | |
| १. | प्रभाग क्र. १ ड (कळस-धानोरी) मधील सर्व्हे नं. ११५ विश्रांतवाडी येथील दफनभूमी विकसीत करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ३२० त्वर्य**

मा.सुनिल कांबळे व मा.दिलिप बराटे यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या विस्तारीत इमारतीमध्ये पदाधिकारी यांचेसाठी व नगरसचिव विभागासाठी फर्निचर व्यवस्था करणे व अंतर्गत सजावटीची कामे करणे या कामाचे र.रू. १,६६,७९,८४४.०० चे ३०.००३% कमी दराचे र.रू. १,१६,७५,३९०.४० चे मे. पंडित लक्ष्मण उंदरे यांचे टेंडर यापूर्वी मा. स्थायी समिती ठराव क्र. २१४० दि. २०/१२/२०१६ अन्वये मान्य झाले आहे.

पुणे महानगरपालिकेचे विस्तारीत इमारतीचे उद्घाटन तातडीने मा. उपराष्ट्रपती महोदय यांचे हस्ते घेण्याचे प्रयोजन असल्याने उर्वरीत कामे तातडीने पूर्ण करणेचे दृष्टीकोनातून '' पुणे महानगरपालिकेच्या विस्तारीत इमारतीमध्ये पदाधिकारी यांचेसाठी व नगरसचिव विभागासाठी फर्निचर व्यवस्था करणे व अंतर्गत सजावटीची कामे करणे'' हे काम ठेकेदार मे. पंडित लक्ष्मण उंदरे यांचेकडूनच त्यांचे टेंडर दरानुसार (३०.००३% कमीदराने) तथापि संपूर्ण पुर्वगणनपत्रक र.रू. १,६६,७९,८४४.०० पर्यंत करून घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ३२१ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे व मा.दिलिप बराटे यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या नविन होणाऱ्या विस्तारीत इमारतीमधील उर्वरीत कामे करणे व जीआरसी डोमचे काम करणे या कामाचे र.रू. ५,०२,६६,१७०.८३ चे १९.१२% कमी दराचे र.रू. ४,०६,५५,२७८.९६ चे मे. दि रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर यापूर्वी मा. स्थायी समिती ठराव क्र. १५२८ दि. ११/१२/२०१७ अन्वये मान्य झाले आहे.

पुणे महानगरपालिकेचे विस्तारीत इमारतीचे उद् घाटन तातडीने मा. उपराष्ट्रपती महोदय यांचे हस्ते घेण्याचे प्रयोजन असल्याने उर्वरीत कामे तातडीने पूर्ण करणेचे दृष्टीकोनातून '' पुणे महानगरपालिकेच्या नविन होणाऱ्या विस्तारीत इमारतीमधील उर्वरीत कामे करणे व जीआरसी डोमचे काम करणे'' हे काम ठेकेदार मे. दि रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचेकडूनच त्यांचे टेंडर दरानुसार (१९.१२% कमीदराने) तथापि संपूर्ण पुर्वगणनपत्रक र.रू. ५,०२,६६,१७०.८३ पर्यंत करून घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ३२२ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे व मा.मारुती तुपे यांचे दि. १२/६/२०१८ चे पत्र.

सन २०१७–२०१८ चे आर्थिक वर्षात मनपा प्रशासनाने पथदर्शक कर्ब स्टोनचा ( डीजीटल) पथ विभागाच्या डी.एस.आर.मध्ये समावेश केला होता. या चालू अंदाजपत्रकात याचा समावेश करण्यात आलेला नाही. या कर्ब स्टोनवर अपघातामध्ये एखाद्या व्यक्तीचे डोके आदळल्यास जिवितहानी होण्याची शक्यता कमी असते. तसेच चौक व रस्ते सुशोभित दिसतात.

तरी पथदर्शक कर्ब स्टोनचा ( डीजीटल) समावेश पथ विभागाच्या डी.एस.आर.मध्ये करण्यास मान्यता देण्यात यावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**